# अनुभवा चित्तवेधक मॉन्सूनमधील लवासा शहराची अद्भुत जादू!

- **या पावसाळ्यात डोंगरावर वसलेल्या लवासामध्ये या, आराम करा, ताजेतवाने व्हा आणि नव्या ऊर्जेने भरून जा**
- **१५ जून ते ३० सप्टेंबर या काळात आकर्षक मॉन्सून पॅकेजेसची मजा लुटा.**

**लवासा, जून २०१४ :** पावसात चिंब भिजलेल्या ग्रामीण भागातल्या हिरव्यागार वनराईकडे पाहिले की तुमचा श्वास रोखला जातो? अध्येमध्ये धुवाँधार धबधब्यांनी गजबजलेल्या डोंगरांमध्ये एक झकास ट्रेक ही तुमची पावसाळ्यातल्या परफेक्ट ब्रेकची कल्पना आहे? या पावसाळ्यात तलावाच्या काठी एखाद्या खानपानगृहात बसून, गालावरून पावसाचे तुषार ओघळत असताना गरमागरम पेयाचा कप हातात असणे हे तुमचे स्वप्न आहे. तुम्ही हे सगळे आणि यापेक्षा अधिक बरेच काही लवासा या भारतातील पहिल्या सुनियोजित थंड हवेच्या ठिकाणी करू शकता. तुमची भेट आणखी आनंददायी करण्यासाठी लवासा सिटीतर्फे आता 'लवासा हॉलिडेज-मेस्मरायझिंग मॉन्सून पॅकेजेस' खुली करण्यात आली आहेत.

सह्याद्रीच्या पर्वतरांगांच्या कुशीत वसलेल्या लवासा या डोंगराळ शहराला भेट देण्यासाठी पावसाळा हा सर्वोत्तम ऋतू आहे. विशाल सरोवर, हिरवाईने फुललेले खोरे, पावसामुळे ठिकठिकाणी कोसळणाऱ्या धबधब्यांपासून तयार झालेले झरे, कडे आणि काळाकभिन्न पाषाण यांच्यामुळे तुमच्या सतत धावत्या भिरभिरत्या नजरेला एक हवाहवासा ब्रेक मिळतो कारण पावसाळ्यात कात टाकून हिरवेगार होणारे लवासा हे त्याच्या सर्वोत्तम टवटवीत रूपात जणू नव्याने प्रकट होते. या धुंद हवेत आनंद, मौजमजा आणि भरपूर धमाल करण्याची भावना जणू काठोकाठ भरलेली असते. तुम्हाला कौटुंबिक सहलीवर जायचे असो किंवा दोघांचीच प्रणयरम्य पावसाळी सफर करायची असो- हे सर्वांसाठी सुयोग्य असे स्थळ आहे. लवासा शहर हे प्रमुख शहरांना जोडलेले आहे आणि तुमच्या तनमनामध्ये नवचैतन्य भरणारे असे या शहरात खूप काही आहे.

'लवासा हॉलिडेज- मेस्मरायझिंग मॉन्सून्स'मधून पावसाळ्याचे आगमन साजरे करणारी अनेक वेगवेगळ्या प्रकारची पॅकेजेस ऑफर करण्यात आली आहेत. लवासामध्ये अॅडव्हेंचर स्पोर्ट्स, नेचर ट्रेल्स, लक्झरी हॉटेल्स, एक्झॉटिक स्पा आणि इतर बऱ्याच गोष्टी असल्यामुळे तुम्हाला कौटुंबिक सहलींची मस्त निवांत आरामदायक संधी मिळते.

LAVASA
HOLIDAYS
MESMERIZING MONSOON

तेव्हा आपली बॅग पॅक करा आणि या पावसाळ्यात लवासाच्या आकर्षक मॉन्सून पॅकेजेसच्या साह्याने धमाल आणि मौजमस्तीच्या आनंदाचा पेटारा उघडा.

अधिक माहितीसाठी लवासामधील टूरिस्ट इन्फर्मेशन सेंटरशी संपर्क साधा जे सर्व दिवस सकाळी नऊ ते संध्याकाळी सहा या वेळात उघडे असते. संपर्कासाठी फोन नं. : +९१ २० ६४७३ १०२२; ५७५७५ या क्रमांकावर ‘HOLIDAYS’ एसएमएस करा किंवा tourism@lavasa.com येथे ई मेल पाठवा.

**लवासाविषयी :** लवासा हे भारतातील पहिले नियोजित थंड हवेचे ठिकाण आहे जिथे नागरिक निसर्गाच्या सानिध्यात राहून काम करू शकतात, शिकू शकतात आणि खेळू शकतात. लवासा कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे (एलसीएल) विकसित करण्यात आलेले हे एक खास शहर आहे. १०,००० हेक्टर्सवर वसलेले हे शहर आधुनिक शहरीकरणाच्या तत्वावर आधारलेले आहे. मुंबईहून तीन तासांच्या तर पुण्याहून तासाभराच्या रस्त्याच्या प्रवासाने लवासाला पोहोचता येते. भविष्यात पाहुणचार, पर्यटन, शिक्षण, आरोग्य, व्यावसायिक संशोधन आणि कारखाने यासारख्या क्षेत्रात लवासातर्फे जागतिक नेत्यांची एक फळीच उभारली जाणार आहे. या थंड हवेच्या ठिकाणी भाडेतत्वावरील घरे, अपार्टमेंट आणि व्हिलाजच्या स्वरूपात काही पारंपरिक आणि कालातीत वास्तुशात्राचे नमुने पाहायला मिळतात. अतिशय उच्च दर्जाच्या सोयीसुविधांमुळे हे शहर इथल्या नागरिकांना एक सुंदर आयुष्य जगण्याची संधी देते.

**अधिक माहितीसाठी कृपया यांच्याशी संपर्क साधा :**

**ॲडफॅक्टर्स पीआर**
श्री. परीक्षित जोशी ङ्ख ९८३३९१७०३० / श्री. निनाद सिद्धये - ९६१९५००७६०
parikshit.joshi@adfactorspr.com / ninad.siddhaye@adfactorspr.com

**लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड**
श्री. अश्विन शेट्टी- ९९६७०२४२९३ / श्री. अंकुल भावसार - ९८२०१६८८४२
ashwin.shetty@lavasa.com / ankul.bhavsar@lavasa.com